# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/02/2024 (शनिवार) सायंकाळ

---

### चोरीच्या गुन्हयातील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

दिनांक २३/०२/२०२४ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हातील ट्रान्सफॉर्मर फोडून कॉपर व अल्युमिनियम चोरीचे प्रमाणात वाढ झालेली असल्याने सदर गुन्हयाचे समांतर तपास व अज्ञात आरोपी शोध करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारे इलेक्ट्रीक ट्रान्सफॉर्मर फोडणारे इसम हे पन्नासे ले आऊट चौदा मैल नागपूर येथे राहत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने व तिचे इथे चोरीचा माल आहे अशी खात्रीपूर्वक माहिती मिळाल्याने संशयीत राहत असलेल्या इसम **विष्णू रामतीर्थ चौरसिया रा, सिध्दार्थ नगर (उ.प्र) ह. मु. चौदामेल व फरार आरोपी आझाद अहमद फारुख शेख रा. चौदा मेल** याचे घराची कायदेशीर झडती घेतली असता घराचे झडती मध्ये चोरी करण्या करिता लागणारे साहित्य मिळून आल्याने आरोपितास सखोल विचारपूस केली असता त्याने नागपूर ग्रामीण मध्ये ट्रान्सफॉर्मर चोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले असून चोरी केलेला मुद्देमाल चोदा मैल येथील कबाडी दुकानदार **प्रेमकुमार साहू रा. चौदामेल नागपूर** यास विकल्याचे सांगितले आरोपी कडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले.

उघडकीस आलेले गुन्हे—

१) पो.स्टे. कळमेश्वर अप क्र. २५/२४ कलम ३७९ भादवी.

२) पो.स्टे. कळमेश्वर अप क्र. १०३७/२३ कलम ३७९ भादवी.

३) पो.स्टे. सावनेर अप क्र. १०९५/२३ कलम ३७९ भादवी.

४) पो.स्टे. बेला अप क्र. ४३०/२३ कलम ३७९ भादवी.

५) पो.स्टे. कुही अप क्र. ८०६/२३ कलम ३७९ भादवी.

६)पो.स्टे. काटोल अप क्र. ६९/२४ कलम ३७९ भा.द.वी.

आरोपीतांकडुन १) लोखंड कापणायची मशीन, आरी, लोखंडी तार कटर ,वेट मशीन ,पाने, `पेंचकूस, पेंचीस एकूण किमती ३०६००/— रु २) २०० किलो तांब्याच्या विंडींग तार की १४०,०००/—रू. असा एकूण १७०६००/— रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोउपनि आशिष मोरखंडे, पोहवा अरविंद भगत, दिनेश अधापूरे, मिलिंद नांदूरकर, गजेंद्र चौधरी, राजू रेवतकर,पोलीस नायक रोहन डाखोरे, अमृत किंणगे, सतीश राठोड, पोलीस अंमलदार राकेश तालेवार, देशमुख, चालक पांडें यांनी पार पाडली.



## जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपींना नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

फिर्यादी नामे— अमोल शांताराम साहारे हा बीपीसीएल कंपनी जवळ बोरखेडी येथे मागील तीन वर्षापासुन किपींगचे काम करीत आहे दि ०८/०२/२४ चे ५/३० वा. आपले राहते घरूण कामावर पायदळ जात असता अंदाजे ६/०० वा सुमारास एक अनोळखी ईसम आपले हातात चाकु घेवुन रोडवर फिर्यादीचे सामोर आला व म्हणाला की चल माल निकाल असे म्हणुन फिर्यादीचे हातावर व मानेवर चाकुन वार करूण फिर्यादीचे पॅडचे खिश्यातुन १०,०००/— रू घेवुन गेला अशा फिर्यादीचे रीपोर्ट वरून पोस्टे बोरी येथे अप क्र. ११३/२४ कलम ३९४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला होता.

दि. २३/०२/२०२४ रोजी पोलिस ठाणे बोरी अप क्र. ११३/२४ कलम ३९४ भा. द.वि. गुन्ह्याचे समांतर तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सायबर सेलचे मदतीने तांत्रिकरीत्या तसेच स्थानिक पातळीवर सदर गुन्ह्यातील आरोपी नामे उमेश अनवर भोसले, वय २० वर्ष, रा. न्यू कॉलनी, जाम, समुद्रपुर, जिल्हा वर्धा यास ताब्यात घेत विचारपुस केली असता काही दिवसा अगोदर त्याचा चुलत भाऊ आकाश भोसले रा. बोरखेडी रेल्वे याने बोरखेडी भारत पेट्रोलियम डेपो येथे असलेल्या टॅंकरचा काच फोडून ड्रायव्हरच्या खिशातील दोन अँड्रॉइड मोबाइल चोरी केले. चोरी केलेले दोन्ही मोबाइल आकाशने उमेशला विकण्यास दिले वरुन उमेशने एक मोबाइल मध्ये त्याचे सिम टाकून काही दिवस वापरून दोन्ही मोबाईल

जाम येथे एका ट्रक ड्रायव्हरला विकले. मिळून आलेल्या आरोपीची वैद्यकिय तपासणी करून पोलिस ठाणे बोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरोपीकडुन सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या मोबाइल मध्ये वापरलेले Vi कंपनीचे सिम कार्ड जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, स.पो.नि. अशिषसिंह ठाकुर, पो.उपनि. आशिष मोरखडे, पोलिस अंमलदार मिलिंद नांदुरकर, महेश जाधव, दिनेश आधापुरे, मयूर ढेकळे, सत्यशील कोठारे, रोहन डाखोरे, अमृत किनगे, चालक अमोल कुथे तसेच सायबर सेल चे सतिष राठोड यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**